


# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.



## “पदवी प्रदान समारंभ बी. एड. बॅच(२०२२-२४)”

## Convocation Ceremony B. Ed. Batch 2022-2024



## अहवाल

## शैक्षणिक वर्ष (२०२४-२०२५)

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी **बी.एड. वर्ग २०२२-२०२४** यांचा **“पदवी प्रदान समारंभ”** महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले होत्या आणि कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. इरफान इनामदार होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शन व आयोजन प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या स्वागत सोहळ्यामध्ये द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. अविनाश काठवटे व गटाने ईशस्तवन व स्वागतगीताच्या स्वरांचे रंग मिसळले. प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी कार्यक्रमाला लाभलेल्या अतिथींचा परिचय करून दिला आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी दिक्षांत समारंभ सुरू करण्याची विनंती स्विकारून स्नातकांना मुंबई विद्यापीठाने अग्रेषित केलेली प्रतिज्ञा दिली. महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले आणि कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. इरफान इनामदार यांनी पदवी प्रदानाला प्रारंभ करून स्नातकांना प्रमाणपत्र वितरित केले. तसेच प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार व प्राध्यापिका डॉ. नीलिमा मोरे यांनी स्नातकांचा थोडक्यात परिचय करून दिला. एकूण ३९ छात्राध्यापकांना पदवी प्रदान करण्यात आली.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे माननीय प्राचार्य डॉ. इरफान इनामदार यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. प्रशांत मौळे यांनी आभारप्रकटीकरण केले आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष छात्राध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप यांनी केले.





जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. इरफान इनामदार यांचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना प्रथम वर्ष छात्राध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार




बी.एड. वर्ग २०२२-२०२४ पदवी प्राप्त छात्राध्यापक







मुंबई विद्यापीठाने अग्रेषित केलेली प्रतिज्ञा स्नातकांना देताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रमा भोसले




महाविद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती.मनिषा पोतेकर पदवी स्विकारताना




विद्यार्थी गुणगौरव करताना प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे




जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. इरफान इनामदार मार्गदर्शन करताना




आभार प्रकटीकरण करताना छात्राध्यापक श्री. प्रशांत मौळे

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## निमंत्रण पत्रिका.

## सस्नेह निमंत्रण.

मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक, बी.एड. वर्ग २०२२-२४ सर्व प्रशिक्षणार्थी व बी.एड. प्रथम आणि द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थींना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयांमध्ये **सोमवार दिनांक २८/०४/२०२५** रोजी **बी.एड. वर्ग :- २०२२-२४ यांचा "पदवीप्रदान समारंभ"** आयोजित करण्यात आला आहे तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**कार्यक्रम अध्यक्ष.**

प्राचार्य.डॉ.रमा भोसले.

**प्रमुख पाहुणे.**

डॉ.इरफान इनामदार.

**(प्राचार्य, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, पनवेल.)**

**संयोजक.**

प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार.

**प्रमुख उपस्थिती.**

प्रा. बिजली दडपे.

प्रा.डॉ. बी.जी. खाडे.

प्रा.डॉ. नीलिमा मोरे.

प्रा.डॉ. उज्ज्वला डोणे.

**वेळ** :- दुपारी १२.०० वाजता.

**ठिकाण** :- सरस्वती कक्ष.

Edit with WPS Office

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## पदवीप्रदान समारंभ.

## कार्यक्रम पत्रिका.

वेळ :- दुपारी १२:०० वाजता. दिनांक :- २८/०४/२०२५.

| | |
|---|---|
| आगमन व आसन ग्रहण. | प्रमुख अतिथी, प्राचार्य व प्राध्यापक. |
| सरस्वती पूजन. | प्रमुख अतिथी, प्राचार्य व प्राध्यापकांच्या हस्ते. |
| स्वागतगीत. | अविनाश काठवटे व समूह. |
| विद्यापीठ गीत. | समूह गायन. |
| प्रास्ताविक व अतिथी परिचय, स्वागत. | प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार. |
| दीक्षांत समारंभ प्रारंभासाठी विनंती. | प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार. |
| दीक्षांत समारंभ घोषणा व प्रतिज्ञा. | मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले. |
| पदवी प्रदानासाठी मान्यता. | मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले. |
| विद्यार्थी गुणगौरव. | प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार, प्रा. डॉ. नीलिमा मोरे. |
| पदवी प्रदान. | मा.प्राचार्य व प्रमुख अतिथींच्या हस्ते. |
| अतिथी मार्गदर्शन. | मा. प्राचार्य. डॉ. इरफान इनामदार. |
| आभार प्रदर्शन. | श्री. प्रशांत मौळे. |
| राष्ट्रगीत. | समूह गायन. |
| सूत्रसंचालन. | श्रीमती. स्मितल कुरूप. |
| छायाचित्रण व शूटिंग. | श्री. आकाश राठोड, श्री. सुजित सुरवसे. |
| तांत्रिक नियोजन. | श्री प्रशांत मौळे, श्रीमती रोहिणी पठाडे. |